**जुन्या रोजगार हमी योजनेंतर्गत**
**दि. १/४/२००८ रोजी अपूर्ण**
**असलेली शासन मान्य यादीतील**
**अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत**
**विशेष मोहिम**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो)
शासन निर्णय क्रमांक रोहयो- २०१३/ प्र.क्र.४५६/रोहयो-८
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक :-२३ डिसेंबर, २०१३.

**वाचा :-**

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक मग्रारोहयो-२००८/प्र.क्र.-२८/रोहयो-६, दिनांक ३० जून, २००९.
२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक मग्रारोहयो-२००८/प्र.क्र.-२८/रोहयो-६, दिनांक २४ जुलै, २०१०.
३) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२०१०/प्र.क्र.-३३३/रोहयो-८, दिनांक १८ मार्च, २०११.
४) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२०११/प्र.क्र.-५३/रोहयो-४, दिनांक १५ सप्टेंबर, २०११.
५) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२०१२/प्र.क्र.-१०३/रोहयो-८, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२.
६) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक सुप्रमा-२०१२/प्र.क्र.-२५९/रोहयो-८, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१३.
७)शासन पत्र, नियोजन विभाग रोहयो क्रमांक सुप्रमा-२०१२/प्र.क्र.२५९/रोहयो-८, दिनांक २३ ऑगस्ट २०१३.
८)शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२०१२/प्र.क्र.-१०३/रोहयो-८, दिनांक १९ सप्टेंबर२०१३.

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये सन २००६, २००७ व २००८ या तीन टप्प्यात केंद्र शासनाची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना लागू झाली. यामधील शेवटचा टप्पा दिनांक १/४/२००८ पासून कार्यान्वित झाला. त्यामुळे दिनांक १/४/२००८ रोजी जुन्या रोजगार हमी योजने अंतर्गतची अपूर्ण असलेली व नवीन योजनेमध्ये हस्तांतरीत होऊ न शकलेली अपूर्ण कामे यांचा आढावा घेण्याचे निदेश सर्व जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. आढाव्याअंती अशी अपूर्ण कामे तीन वर्षाचा

कालबध्द कार्यक्रम आखुन जुन्या रोजगार हमी योजनेच्या पध्दतीनुसार पूर्ण करण्यास संदर्भिय अनुक्रमांक १ ते ३ अन्वये मान्यता देण्यात आली होती. ही अपूर्ण कामे पूर्ण करण्याची मुदत (सर्वसाधारणपणे ) दिनांक ३० जून, २०१२ पर्यंत होती. या विहित मुदतीत काही अपूर्ण कामे पूर्ण न झाल्याने व मंत्रीगटाच्या शिफारशींच्या अनुषंगाने ती पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० जून, २०१३ पर्यंत संदर्भिय अनुक्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली होती. या अपूर्ण कामावर झालेला खर्च वाया जाऊ नये तसेच या कामांचा जास्तीत जास्त लाभ जनतेस होण्याच्या दृष्टीने दि. ३० जून, २०१४ पर्यंत ही कामे पूर्ण करण्यास संदर्भिय अनुक्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये अंतिम मुदत वाढ देण्यात आली आहे.

अशा जुन्या रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या अपूर्ण कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना असलेल्या वित्तीय अधिकारात दिनांक १८ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये वाढ केलेली आहे. तसेच जुन्या रोहयो मधून जुनी कामे वगळण्याची सुधारित कार्यपध्दतीही संदर्भिय अनुक्रमांक ४ येथील दि. १५ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये घोषित केली. अशी सर्व कार्यवाही करुनही जुन्या रोजगार हमी योजनेमधील अपूर्ण कामे पूर्ण झालेली नाहीत. दरम्यानच्या काळात प्रत्येक वर्षी मजुरांच्या मजुरीच्या दरात, जिल्हा दरसुचीत, गौण खनिजाच्या दरात वाढ झालेली आहे. त्यामुळे ही अपूर्ण कामे जुन्या दरानुसार पूर्ण करण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. तसेच ही कामे ब-याच कालावधीपासून अपूर्ण असल्याने विहित अटींमध्ये , मापदंडामध्ये, प्रमाणामध्ये व वित्तीय अधिकारामध्ये करण्यास अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अशा परिस्थितीत ही अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी एक विशेष मोहिम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत.

**शासन निर्णय** :-

जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील पूर्ण झालेली व वगळलेली कामे सोडून निव्वळ शिल्लक असलेल्या कामांची जिल्हानिहाय संख्या सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये देण्यात आलेली आहे. ही अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० जून २०१४ पर्यंत अंतीम मुदतवाढ देण्यात आलेली असून या मुदतीत सदरची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात:-

१) जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील रस्ते व पाझर तलावाची जी कामे दिनांक ३० जून, २०१३ रोजी अपूर्ण आहेत अशी कामे प्राथम्याने पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० जून २०१४ पर्यंत विशेष मोहिम राबविण्यात यावी. शासनमान्य कामे या विशेष मोहिमेतंर्गत पूर्ण करण्याबाबतची सर्व जबाबदारी जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविण्यात येत आहे.

२) जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील ज्या अपूर्ण कामांच्या बाबतीत अनियमितता आहे, त्या अनियमिततेबाबत स्वतंत्र प्रशासकीय चौकशी करावी. तथापि चौकशी पूर्ण होईपर्यंत काम बंद ठेवण्यात येऊ नये. कामाची संयुक्त मोजणी झाली असेल तर काम पुढे चालू करण्यास हरकत नाही. संयुक्त मोजणी झाली नसल्यास जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णय, नियोजन विभाग, क्रमांक रोहयो-२०११/प्र.क्र.१६/रोहयो-२, दिनांक १७ नोव्हेंबर, २०११ नुसार ती तात्काळ करुन घेऊन पुढील कार्यवाही करावी.

३) अपूर्ण असलेल्या कामांपैकी बहुतांश कामावरील अकुशल भाग पूर्ण झालेला असून कुशल भाग अपूर्ण अवस्थेत आहे. त्यामुळे सदर कामांवरील पूर्ण झालेल्या अकुशल भागावरील मजुरीचा खर्च जुन्या दराप्रमाणे गणला जात असून अपूर्ण असलेल्या कुशल भागाची प्रचलित वाढीव दराप्रमाणे गणना केली जात असल्याने मुळ अंदाजपत्रक व सुधारित अंदाजपत्रक यामधील अकुशल कुशल या बाबींचे ५१:४९ हे प्रमाण बदलले जात आहे. त्यामुळे ही जूनी अपूर्ण कामे ५१:४९ या प्रमाणात बसत नाहीत. अशा परिस्थितीत ही अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी ५१:४९ या प्रमाणापासून सुट देण्यात येत आहे.

४) जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील ज्या अपूर्ण कामात गैरव्यवहार झालेला असेल व संयुक्त मोजणी झालेली नसेल अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णय क्र. रोहयो- २०११/ प्र.क्र. १६/ रोहयो-२ दि. १७/११/२०११ नुसार संयुक्त मोजणी तात्काळ करुन घेवून पुढील कार्यवाही करावी. अशा अपूर्ण कामांच्या सुधारित अंदाजपत्रकामध्ये निलंबन रक्कम रुपये १५ लाखापर्यंत असेल तर अशा अपूर्ण कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकारी यांनी दयावी आणि निलंबन रक्कम रूपये २५ लाखापर्यंत असल्यास विभागीय आयुक्त यांनी दयावी. निलंबन रक्कम रु. २५ लाखाच्या पुढे असल्यास ती शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावीत.

५) जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील जी कामे दि. ३०.६.२०१३ रोजी अपूर्ण आहेत व जी कामे विहीत केलेल्या आर्थिक मापदंडात बसत नसतील तर अशा कामांच्या बाबतीत शासन निर्णय दि. १५/९/२०११ नुसार कार्यवाही (वगळण्याबाबत) करावी.

६) जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील ज्या अपूर्ण कामामध्ये शेतकरी हरकत अथवा अडथळा आहे किंवा न्यायालयीन प्रकरण आहे अशी कामे जुन्या रोजगार हमी योजनेमधून पूर्ण करणे शक्य नाही व त्यावर अल्प खर्च झालेला आहे अशी जिल्हाधिकारी यांची खात्री झाल्यास अशा कामावर झालेला खर्च निर्लेखित करण्याचा प्रस्ताव सादर करावा. जी कामे इतर खात्यामार्फत किंवा योजने अंतर्गत पूर्ण करणे शक्य आहे अशी कामे इतर खात्यामार्फत किंवा योजने अंतर्गत पूर्ण करण्याची कार्यवाही करावी. तसेच ज्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर १०% अथवा त्यापेक्षा कमी खर्च झालेला असेल अशी कामे जुन्या रोहयो मधून वगळण्यात यावीत व संबंधित विभागाकडे सुपूर्द करण्यात यावीत. वरील बाबींच्या अनुषंगाने शासन निर्णय दि. १५/९/२०११ चा प्रभाविपणे वापर करण्यात यावा.

७) सदर अपूर्ण कामे पूर्ण होताच निधी मागणीबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) या अपूर्ण कामांपैकी पाझर तलावाची कामे पूर्ण होताच जिल्हाधिकारी कार्यालयाने कुशल कामांवरील झालेल्या खर्चासाठी निधी मागणीचा प्रस्ताव १५ दिवसात शासनास सादर करावा.

ब) या अपूर्ण कामांपैकी रस्त्यांची कामे पूर्ण होताच जिल्हाधिकारी कार्यालयाने कुशल कामांवरील झालेल्या खर्चासाठी निधी मागणीचा प्रस्ताव १५ दिवसात संबंधित विभागीय आयुक्तांना सादर करावा आणि विभागीय आयुक्त कार्यालयाने सदर प्रस्तावाची छाननी करुन आपल्या अभिप्रायासह हा प्रस्ताव १५ दिवसात शासनास सादर करावा.

८) सदर आदेश वैयक्तिक लाभधारक स्वरुपाच्या योजना उदा. फलोत्पादन, जवाहर विहीरी, खाजगी जमिनीवर सामाजिक वनिकरण, वनिकरण इत्यादी कामांना लागू राहणार नाहीत. तर फक्त जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील पाझर तलाव व रस्त्यांच्या अपूर्ण कामांना लागू राहतील.

९) हे आदेश विशेष मोहिमे अंतर्गत फक्त दि. ३०/६/२०१४ पर्यंतच अमलात राहतील.

१०)सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. 201312231436167716 असा आहे.

महराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(व्ही. गिरीराज)
प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री/राज्यमंत्री (रोहयो व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
उप सचिव, विधानमंडळ रोहयो समिती (४० प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग.
प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
सर्व उप सचिव/अवर उपसचिव/कार्यासन अधिकारी (रोहयो प्रभाग)
निवड नस्ती, रोहयो-८.

**शासन निर्णय, नियोजन विभाग(रोहयो) : क्रमांक रोहयो- २०१३/ प्र.क्र.४५६/रोहयो-८, दि. २३ डिसेंबर, २०१३ सोबतचे प्रपत्र-अ**

| अ.क्र | जिल्हा | शासन मान्य एकूण अपूर्ण कामे | वगळलेली व पूर्ण झालेली कामे सोडून निव्वळ शिल्लक कामे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | औरंगाबाद | १३८७ | ६३ |
| २ | जालना | ११३९ | ६२ |
| ३ | परभणी | १५० | १६ |
| ४ | लातूर | ५५५ | ४७ |
| ५ | उस्मानाबाद | ९३८ | १०१ |
| ६ | हिंगोली | ३० | १२ |
| ७ | नांदेड | २२२ | ५३ |
| ८ | बीड | १७४७ | ४२७ |
| ९ | अहमदनगर | ३६१ | ५ |
| १० | जळगाव | ८२ | २४ |
| ११ | धुळे | ९५ | ३ |
| १२ | नाशिक | २६७ | २३ |
| १३ | नंदूरबार | ७१ | ६ |
| १४ | अकोला | ३० | १ |
| १५ | यवतमाळ | १६१ | १५ |
| १६ | बुलढाणा | २४५ | ४ |
| १७ | सांगली | २९३ | ३ |
| १८ | भंडारा | ६४७ | ११ |
| १९ | रत्नागिरी | २२९ | २ |
| | **एकूण** | | **८७८** |